# कार्यालय पोलीस उप अधीक्षक
# लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर

हुतात्मा स्मारक मागे, वरोरा नाका, चंद्रपूर.

दुरध्वनी क्र. 07172-250251

Email: - dyspacbchandrapur@mahapolice.gov.in,

acbchandrapur@gmail.com


## प्रेसनोट

**चंद्रशेखर केशव रामटेके, ग्रामसेवक, मौजा लोंढोली, ता. सावली, जि. चंद्रपूर यांना लाच प्रकरणात अटक**

तक्रारदार हे मौजा लोंढोली ता. सावली जि. चंद्रपूर येथील रहीवासी असून त्यांचे वडीलांचे नावे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल मंजुर झाले आहे. सदर घरकुल मंजुर झाल्यानंतर त्यासंबंधाने तक्रारदार हे संपुर्ण काम पाहत होते. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मंजुर झालेल्या एकूण १,२०,०००/-रू. पैकी पहिला हप्ता १५,०००/-रू. दिनांक २२/०२/२०२५ रोजी तक्रारदार यांना मिळालेला आहे. परंतु मौजा लोंढोली येथील ग्रामसेवक श्री. चंद्रशरेखर केशव रामटेक यांनी तक्रारदार यांनी तक्रारादार यांना दुसरा हप्ता ७०,०००/-रू. मंजुर करून देण्याचे कामाकरीता तक्रारदार यांना २०,०००/-रू. लाचेची मागणी केली. तक्रारदार यांची श्री. चंद्रशेखर रामटेके ग्रामसेवक लोंढोली यांना २०,०००/-रु. लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने श्री. रामटेके यांचे विरुध्द ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथे तक्रार दिली.

प्राप्त तक्रारीवरुन दिनांक २५/०२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान **गै.अ. चंद्रशेखर केशव रामटेके, ग्रामसेवक** यांनी तक्रारदार यांना २०,०००/-रु. लाचेची मागणी करून तडजोडीअंती १०,०००/-रू. आज रोजी व १०,०००/-रू. नंतर स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यावरुन आज दिनांक २५/०२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान गै.अ. चंद्रशेखर रामटेके यांनी तक्रारदाराकडून १०,०००/-रू. लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. त्यावरुन आज दिनांक २५/०२/२०२५ रोजी पो.स्टे. सावली, जि. चंद्रपूर येथे आरोपी लोकसेवक यांचे विरुध्द गुन्हा नोंद करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कार्यवाही ही डॉ. श्री. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर, श्री. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांचे मार्गदर्शनात पोलीस उप अधीक्षक श्रीमती मंजुषा भोसले, ला.प्र. वि. चंद्रपूर, तसेच कार्यालयीन स्टॉफ पो.हवा. नरेशकुमार नन्नावरे, हिवराज नेवारे, प्रदीप ताडाम, म.पो.अं. पुष्पा काचोळे, चा.पो.अं. संदिप कौरासे यांनी यशस्वी पार पाडली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी किवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतीरिक्त लाचेची मागणी करीत असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

**डॉ. श्री. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर,**
**श्री. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर,**
**पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय नागपुर**
**फोन क. ०७१२-२५६१५२०**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर**
**फोन क. ०७१७२-२५०२५१**
**टोल फ्री नंबर- १०६४**
**श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उप अधीक्षक - ९३२२२५३३७२**
**श्री. जितेंद्र गुरनुले, पोलीस निरीक्षक - ८८८८५७१८४**
**Website www.acbmaharashtra gov in**

कार्यालय पोलीस उप अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, चंद्रपूर

**मंजुषा म. भोसले**
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर

Scanned with OKEN Scanner